# कचऱ्याचा पुनर्वापर करा : प्रा. नांगिया

पुणे, ता. २० : ''कचरा समस्या सोडविण्यासाठी 'रिड्यूस, रियुज आणि रिसायकल' या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे आहे,'' असे मत 'सीएसआयआर-एनसीएल'चे संचालक प्रा. अश्विनी कुमार नांगिया यांनी व्यक्त केले.

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (सीएसआयआर-एनसीएल) यांच्या वतीने 'www.petrecycling.in' या संकेतस्थळाचे उद्‍घाटन करण्यात आले. या वेळी 'देशात प्लॅस्टिकच्या वाटल्यांचा पुनर्वापर' या विषयावर कार्यक्रमात प्रा. नांगिया बोलत होते. संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. मागेश नंदगोपाल म्हणाले, ''प्लॅस्टिकच्या वाटल्या व कचऱ्यापासून पॉलिस्टर फायबर उत्पादित करण्यात येते. त्याचा वापर उश्या बनविण्यासाठी आणि धाग्यात रूपांतर करून कपडे बनविण्यासाठी केला जातो.''

Sakal, 21 Feb 2017